मला माहितीये, आपल्यातील 10 मधील 7 जणांना शेअर बाजारातील बेसिक गोष्टींबद्दल फारशी काही कल्पना नाहीये. त्यामुळे सामान्य मराठी युवकांनी शेअर बाजारात गुंतवणूक करण्याचे प्रमाण अतिशय कमी आहे (जर आपण गुजरात राज्याशी तुलना केली तर).

मला आठवते, मी पदवीला असताना माझ्यासोबत असणार्या अनेक गुजराथी मुलांच्या सारख्या शेअर बाजाराबद्दल चर्चा चालु असत. आम्ही मराठी पोरं मात्र ढीम्म चेहर्याने त्यांच्याकडे सारखे पाहत असायचो. तेव्हा आम्हाला शेअर बाजाराचा 'शे' ही कळत नव्हता (अर्थात आता जसे आम्ही शेअर बाजारचे खुप मोठे एक्सपर्ट झालोय अशातलाही काही भाग नाहीयेJ). मी अनेकदा माझ्या गुजराथी मित्रांकडुन शेअर बाजाराबद्दल, त्यात गुंतवणूक करण्याबद्दल जाणुन घ्यायचा प्रयत्न केला होता पण सर्वकाही डोक्यावर बाऊंस होऊन परतायचे. म्हणुनच हा प्रपंच साधुन मी माझ्यासारख्या माझ्या अनेक मराठी मित्रांसाठी ही बेसिक माहिती पोस्ट करीत आहे. आशा आहे की, तुमच्यासाठी ही माहिती उपयुक्त सिद्ध होईल.

****

'शेअर' चा सरळसरळ अर्थ म्हणजे 'भाग', आणि शेअर बाजाराचा भाषेत 'कंपनीचा भाग'. उदाहरण द्यायचे झाले तर समजा एखाद्या कंपनीने तिचे एकुण 10 लाखांचे शेअर विक्रीसाठी काढले आणि तुम्ही त्या कंपनीचा प्रस्तावानुसार, जितके अंश (शेअर) खरेदी करता तेवढेच तुम्ही त्या कंपनीचा मालकत्व हक्काचे भागीदार होतात.

त्या अंशाला तुम्ही जेव्हा पटेल तेव्हा अन्य ग्राहकाला विकु शकतात. तुम्ही 100 पासुन ते जास्तीत जास्त शेअर खरेदी करु शकतात.

कंपनी जेव्हाही शेअर विकते तेव्हा कोणत्या व्यक्तीला वा समुहाला किती शेअर विकायचे हा त्या कंपनीचा स्वामित्व अधिकार असतो.

बाजारातुन शेअर खरेदी/विक्रीसाठी ब्रोकर्स असतात, जे त्यांचे कमिशन काढुन ग्राहकाला सेवा पुरवितात.

ह्या कंपन्यांच्या शेअरची किंमत मुंबई शेअर बाजार (बी.एस.ई.) मध्ये नोंद होत असते. सर्व कंपन्यांची किंमत त्यांचा लाभदायक क्षमतेनुसार कमी-जास्त होत असते.

शेअर बाजारातील सर्व व्यवहारांवर सेबीचे नियंत्रण असते.

प्रत्येक सहामाही/वार्षिक आधारांवर कंपनी लाभ झाल्यावर शेअर होल्डर्सला लाभांश देत असते आणि कंपनीच्या गतिविधींबद्दलही माहिती पुरवित असते.

शेअर बाजारात लिस्टेड होण्यासाठी कंपनीला लिखित एग्रीमेंट करावा लागतो. ज्याचानुसार, कंपनी आपली प्रत्येक हालचालीची माहीती बाजाराला पुरवित असते. खासकरुन अशी माहीती जी शेअर होल्डर्ससाठी हिताची असते.

याच माहीतीच्या आधारावर मागणीत होणार्या चढ-उतारामुळे शेअर्सच्या किंमतीतही वाढ-घट होत असते.

जर का एखादी कंपनी लिस्टींगचा नियमांचे उल्लंघन करताना आढळली तर तिला डिलीस्ट करायची कारवाई सेबी करते.

1) पॅन कार्ड (परमनंट अकाऊंट नंबर):

पॅन कार्ड हे एक अक्षर-अंक मिश्रित कोड असलेले एक कार्ड असते. प्रत्येक व्यक्तीच्या पॅन कार्डवर एक वेगळा कोड असतो. हे कार्ड भारतीय आयकर विभागाकडुन इश्यु करण्यात येते. आपल्या आर्थिक व्यवहारांसाठी हे कार्ड म्हणजे एक मुलभूत गरज आहे. शेअरबाजारात गुंतवणूक करण्याकरीताही पॅन कार्ड असणे ही प्राथमिक गरज आहे..

2) ब्रोकर:

शेअर बाजारात आपण भाजी मार्केटप्रमाणे स्वत: जाऊन शेअर खरेदी/विक्री करु शकत नाही. ते काम करण्यासाठी काही खास लोकं नेमलेली असतात, ज्यांना ब्रोकर म्हणतात. ब्रोकर एखादी व्यक्ती असु शकते, कंपनी असु शकते किंवा एखादी ऑनलाईन एजेंसीही (सेबीचे लाईसंसप्राप्त) असु शकते.

3) डिमॅट अंकाऊंट:

ब्रोकर ठरविल्यानंतर, डिमॅट अकाऊंट उघडण्याची आवश्यकता असते ज्याच्यात आपल्या नावावरचे शेअर्स असतात (शेअर्स तुम्ही फक्त अश्याचप्रकारे स्टोर करु शकतात). तुम्ही खरेदी केलेले सर्व शेअर्स हे डिमॅट अकाऊंटमध्ये स्टोर होत असतात. शेअर्स विक्रीचीही माहिती येथे स्टोर होत असते. शेअर खरेदी-विक्रीचा सगळा लेखाजोखा डिमॅट अकाऊंटमध्ये दिसतो. ब्रोकर अकाऊंट उघडताना आपल्याला सर्व माहिती पुरवितो.

4) ट्रेडींग अकाऊंट:

ट्रेडींग अकाऊंटमधुन खरेदी-विक्रीची प्रक्रिया पार पडत असते. हे अकाऊंट शेअर्सच्या खरेदी-विकीसाठी एका मधस्थीप्रमाणे कार्य करीत असते. साधारणत: ब्रोकर्स आपल्या ह्या अकाऊंट्सची काळजी घेत असतात पण तुम्हालाही याची माहिती ठेवणे गरजेचे आहे.

5) डिपॉझिटरी पार्टीसिपंट:

देशात दोन संस्था याकरीत कार्यरत आहेत, NSDL (National Securities Depository Limited) आणि CDSL (Central Depository Securities Limited). ह्या संस्थाचे एजेंटस असतात जे डिपॉझिटरी पार्टीसिपंट म्हणुन कार्यरत असतात. ते एक अकाऊंट प्रदान करतात ज्यात सध्या तुमच्या नावावर किती शेअर आहेत हे दर्शविते [ हे अकाऊंट वरील दोघा अकाऊंटपेक्षा वेगळे असते, डिमॅट अकाऊंट (आपल्या शेअर्सची संख्या दर्शविते) आणि ट्रेडींग अकाऊंट (शेअर खरेदी-विक्रीसाठी)]. डिपॉझिटरी पार्टीसिपंट आपण खरेदी केलेले शेअर्स धरुन ठेवतात व विक्री केलेले शेअर्स मुक्त करतात. ब्रोकर आपल्याला अकाऊंट्स उघडताना आणि डिपॉझिटरी रजिस्टर करताना सर्व माहिती पुरवित असतो.

6) UIN (Unique Identifcation Number):

तुम्हाला जर मोठी गुणवंतुक करावयाची असल्यास (एका वेळेस साधारणत: 1 लाख किंवा त्यापेक्षा अधिक) हा नंबर असणे गरजेचे असते.

7) शेअर खरेदी:

जेव्हाही तुम्हाला शेअर खरेदी करावयाचे असल्यास तेव्हा तुम्हाला तुमच्या ब्रोकरला पुर्वकल्पना द्यावी लागते की, कोणते आणि किती शेअर, कोणत्या भावाला घेण्यास तुम्ही इच्छुक आहात. उदाहरण: तुम्हाला रिलायंस इंडस्ट्रीज लिमिटेडचे 10 शेअर्स, बाजारभाव 885 पोहोचल्यावर घ्यावयाचे आहेत तेव्हा तुम्ही ब्रोकरला सांगाल की, रिलायंस इंडस्टीज लिमिटेड, 10 शेअर्स, बाजारभाव 885. ब्रोकर ती ऑर्डर घेऊन जेव्हा त्या शेअरचा भाव 885 ला पोहोचेल तेव्हा लगेच तुमचे शेअर खरेदी करुन घेईल. ऑनलाईन ब्रोकर्सचे कस्टमर केअरचेही नंबर असतात ज्यावर कॉल करुन तुम्ही ऑर्डर देऊ शकतात.

8) शेअर विक्री:

शेअर विक्रीचीही सारखीच प्रक्रिया असते. उदाहरण: ब्रोकरला ऑर्डर द्यायची की, विक्री: रिलायंस इंडस्ट्रीज लिमिटेड, 3 शेअर, शेअर भाव 895. जेव्हा शेअरचा भाव 895 वर पोहोचेन तेव्हा तुमचा ब्रोकर लगेच ते शेअर विकण्याची प्रक्रिया सुरू करेल. खरेदी/विक्रीची ही प्रकिया फक्त काही काळासाठी असते (तेवढ्या दिवसापुरता किंवा पुढच्या दिवसापर्यंत), जर या दरम्यान खरदी/विक्रीची किंमत जर तुमच्या पसंतीच्या किमतीवर नाही पोहोचली तर तुमची ऑर्डर रद्द होते व तुम्हाला पुन्हा नवीन ऑर्डर द्यावी लागते. तुमचा ब्रोकर यासंबंधीची माहिती तुम्हाला वेळोवेळी देतच असतो. शेअर्सच्या खरेदी/विक्रीसाठी भारतात फक्त दोन एक्सचेंजेस आहेत, बॉम्बे स्टॉक एक्सचेंज आणि नेशनल स्टॉक एक्सचेंज.

9) समंजसपणा:

शेअर बाजारात जर तुमचा काही काळ चांगला गेला असेल, तुम्ही चांगला पैसाही कमावला असेल तर असे मात्र समजुन घेऊ नका की, तुम्हाला आता शेअर बाजाराबद्दल खुप काही ज्ञान मिळाले आहे. शेअर बाजार हा एक अतिशय किचकट मार्ग आहे पैसे कमवायचा. शेअर बाजाराला चांगल्याप्रकारे समजण्याकरीत आवश्यकता असते ती वेळेची, समर्पिततेची आणि ज्ञानाची, तरीसुद्धा अश्या मोठमोठ्या एक्सपर्टनी बाजाराबद्दल लावलेला अनुमान हा अचुकच निघेल याची काही शाश्वती नसते.

10) सहनशीलता:

नवख्या लोकांची एक खासीयत असते, जर कधी बाजार कोलमडला किंवा त्यांच्या कंपनीची ‘टाय टाय फिश’ झाली तर लगेच ते शेअर्स विक्रीस काढतात आणि घाट्यात जातात. अश्यावेळेस सहनशीलता असणे महत्त्वाचे ठरते. अनुभवी गुंतवणूकदाराला माहिती असते की, आज खचलेला भाव उद्या कोलांटउडी मारुन पटींनी वाढुही शकतो. योग्य अनुभव व बाजाराभावाच्या पॅटर्नबद्दल थोडीशी माहितीही यावेळेस उपयुक्त ठरु शकते. नवख्यांनी शक्यत: आधी कमी गुंतवणूकीने सुरूवात करावी मग अनुभवासोबत रिस्क घेऊन पुढे वाटचाल करता येते नाहीतर ‘खाया पिया कुछ नही ग्लास तोडा बाराना’ व्हायचा.